निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत
श्री.संजय बाबुराव निकाळे सेवानिवृत्
सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पंचायत
समिती कोपरगांव

जिल्हा परिषद अहिल्यानगर
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.कार्या/पंस/आस्था-1/ 163 /2025
अहिल्यानगर दिनांक 24/02/2025

संदर्भ :- 1. इकडील निलंबन आदेश क्र.पसं/आस्था-1/0922/2022 दिनांक 01.11.2022
2. इकडील आदेश क्र.पसं/आस्था-1/202/2023 दिनांक 23.03.2023
3. सहाय्यक आयुक्त (चौकशी ) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा.4/खाचौ/सी.आर.42/2023 दिनांक 04 एप्रील 2024
4. या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.पसं/आस्था-1/769/2024 दि.18.7.2024
5. गटविकास अधिकारी पंचायत समिती कोपरगांव यांचेकडील पत्र क्र.वशि/आस्था-1/1613/2023 दिनांक 18.08.2023
6. या कार्यालयाची नोटीस जा.क्र.पसं/आस्था-1/868/2024 दि.10.9.2024
7. श्री.संजय बाबुराव निकाळे सेवानिवृत्त सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांनी सादर केलेला नोटीसचा खुलासा दिनांक 12.11.2024
8. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.डिईएन 1895/1659/प्र.क्र.1209/20 दिनांक 24 नोव्हेंबर 1995
9. महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने नियम 1981 मधील नियम 70 व 72 (7) (5)

श्री.संजय बाबुराव निकाळे,सहाय्यक पशुधन विकास अधिकारी,हे पशुवैदयकीय दवाखाना चंदनापनुरी ता.संगमनेर येथे कार्यरत असताना कर्तव्यात कसुर करुन गैरवर्तणूक केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( वर्तणुक ) नियम 1967 मधील नियम 3 चा भंग केल्याने श्री.निकाळे यांना संदर्भ क्रमांक 1 च्या आदेशान्वये सेवेतुन सेवा निलंबित करणेत आलेले होते.

श्री.निकाळे संजय बाबुराव ,सहाय्यक पशुधन विकास अधिकारी ,पशुवैदयकीय दवाखाना चंदनापुरी ता.संगमनेर यांना संदर्भ क्रमांक 2 च्या आदेशान्वये कुक्कुटपालन प्रकल्प कोपरगांव ता.कोपरगांव येथे पुन:स्थापीत करणेत आलेले आहे.

संदर्भ क्र.3 अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी ) नाशिक विभाग नाशिक यांचे अहवालानुसार श्री.निकाळे यांचेवर ठेवण्यात आलेले पाच ही आरोप सिध्द होत असलेने संदर्भ क्र.4 अन्वये सेवानिवृत्ती वेतनातुन 5 टक्के रक्कम कायमस्वरुपी कपात करणेची शिक्षा अंतिम करणेत आलेली आहे.

संदर्भ क्र.5 अन्वये श्री.निकाळे संजय बाबुराव सेवानिवृत्त सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती कोपरगाव, यांचा दिनांक 09/11/2022 ते दिनांक 23.3.2023 ( एकुण 135 दिवस ) या निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत प्रस्ताव कार्यालयास सादर केला आहे.

संदर्भ क्र.6 नुसार महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहण अवधी , स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने ) नियम 1981 च्या नियम 72 (7) (5) मधील तरतुदीनुसार श्री.निकाळे संजय बाबुराव सेवानिवृत्त सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती कोपरगाव, यांचा दिनांक 09/11/2022 ते दिनांक 23.03.2023 ( एकुण 135 दिवस ) कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत न केलेला कालावधी म्हणुन का समजण्यात येऊ नये ? याबाबतचा लेखी खुलासा मागविण्यात आला होता.श्री.निकाळे यांनी संदर्भ क्र.7 अन्वये खुलासा सादर करुन खुलाश्यात दिनांक 09.11.2022 ते दिनांक 23.03.2023 या सेवा निलंबन कालावधीत आपले कार्यालयाच्या आदेशानुसार मी दिलेल्या मुख्यालयी उपस्थित राहिलो आहे.त्यामुळे सदर कालावधी हा कामावर व्यतीत न केलेला कालावधी म्हणुन समजण्यात येऊ नये तर सलग सेवा कालावधी धरण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.श्री.निकाळे यांनी सादर केलेला खुलासा अमान्य करणेत येत आहे.

संदर्भ क्र. 8 व 9 नुसार ,महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहन अवधी ,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळांतील प्रदाने ) नियम 1981 मधील नियम-72(5)(7) मधील तरतुदीनुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन,मी मुख्य कार्यकारी अधिकारी ,श्री.निकाळे संजय बाबुराव सेवानिवृत्त् सहाय्यक पशुधन विकास अधिकारी कुक्कुटपालन प्रकल्प् ता.कोपरगांव यांचा निलंबन कालावधी दिनांक 09/11/2022 ते दिनांक 23/03/2023 ( एकुण 135

दिवस ) हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ ,कामावर व्यतीत न केलेला कालावधी म्हणुन मानन्यात येईल असे आदेश देत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.निकाळे संजय बाबुराव सेवानिवृत्त् सहाय्यक पशुधन विकास अधिकारी कुक्कुटपालन प्रकल्प् कोपरगांव ता.कोपरगांव यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक क्रमांक 20250224110004 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 24-02-2025 11:27:07
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- गट विकास अधिकारी , पंचायत समिती कोपरगांव.

2/- सदरचा आदेश सबंधितास बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास संत्वर सादर करावी.

प्रत :- गट विकास अधिकारी , पंचायत समिती संगमनेर / कोपरगांव.